**प्रेस नोट ता. २९/०५/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड**

# रेकॉर्डवरील विधीसंघर्षीत बालकाकडुन एकुण ०४ गुन्हे उघड करीत किं.रु.१,९२,०००/- चा मुद्देमाल जप्त

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात मोटार सायकल चोरी, मोबाईल चोरी, बंद घरातील चो-या यामध्ये मोठया मोठया प्रमाणात वाढ झालेने त्याअनुषंगाने **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना जास्तीत जास्त पोलीस अंमलदार नेमुन सतर्क पेट्रोलींग करणेबाबत तसेच गुन्हे प्रकटीकरण विभागातील पोलीस अधिकारी, अंमलदार यांना सक्त पेट्रोलींग करुन चोरीचे गुन्हयांना आळा घालणेबाबत आदेश दिले आहेत.

इसम नामे मोहंमद उमर कमरेआलम तोहीर रा.अश्विनी मार्केटजवळ शिवतिर्थ नगर थेरगाव पुणे यांनी तक्रार दाखल केली की, दि.२४/०५/२०२३ रोजी सकाळी ०७.१० वा सुमा. कुणाल रेसीडेन्सी प्रसुनधाम रोड थेरगाव पुणे येथुन पायी चालत जात असताना मोटार सायकलवरील आलेल्या अनोळखी इसमाने त्यांचे हातातील मोटोरोला मोबाईल जबरीने हिसकावुन चोरुन निघुन गेला.असा गुन्हा दाखल आहे.

मा.श्री.गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी तपास पथकातील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांना तपास पथक अंमलदारांचे मदतीने प्रतिबंधात्मक पेट्रोलींग करत गुन्हयांना आळा घालुन गुन्हे उघड करणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सिसीटीव्ही फुटेजचे आधारे तपास सुरु केले असता असे निदर्शनास आले की, सदरचा अनोळखी चोरटा हा रेकॉर्डवरील विधीसंघर्षीत बालक असुन तो नढेनगर काळेवाडी पुणे येथे राहणारा आहे अशी खात्री झाली. सदरचा विधीसंघर्षीत बालक हा थेरगाव भागातील विहीनी साहेब कॉलनी येथे येणार असलेची खात्रीशीर बातमी मिळालेने सापळा कारवाई करुन त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याचेकडुन एकुण ०४ गुन्हयांची उकल करत किं.रु. १,९२,०००/- चा माल जप्त करणेत आला आहे. विधीसंघर्षीत बालकास सुधारगृहात जमा केले आहे.

विधीसंघर्षीत बालकाकडुन खालील गुन्हे उघड केले आहेत.

| अ.क्र | पोलीस स्टेशन | गु.रजि.नं. |
|---|---|---|
| १ | वाकड | ५०६/२०२३ भादविक ३९२, |
| २ | वाकड | ४६४/२०२३ भादविक ३७९ |
| ३ | चिंचवड | २३७/२०२३ भादविक ३७९ |
| ४ | चिखली | १०३/२०२३ भादविक ३७९ |

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे,पोहवा.वंदु गिरे, पोहवा संतोष बर्गे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.प्रशांत गिलबीले, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड